# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


महत्त्वाचे

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी ऑनलाईन/पुवि/२०१६ /२४५८.

दिनांक :- 6 APR 2017

प्रति,

**सर्व प्राचार्य,**
**उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय,**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र.**

विषय :- **इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८ साठी रजिस्ट्रेशनसाठी सूचना**

संदर्भ :-१)शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६
२)शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश सन २०१७-१८ साठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन बाबत खालील प्रमाणे माहिती सोबत आणणे आवश्यक आहे.

१) कॉलेज रजिस्ट्रेशनसाठी pune.11thadmission.net/index.html या संकेतस्थळावरील फॉर्ममध्ये ए ते एच कॉलमची माहिती भरणे आवश्यक आहे. **(सोबत जोडलेला आहे.)**

२) इ. ५ वी ते १२ वी पर्यंत च्या शाळांचे सांकेतांक क्रमांक व युडायस क्रमांक महानगरपालिका क्षेत्रातील आपल्या संस्थेच्या शाळांचे नावे समाविष्ट करण्यासाठी घेवुन येणे. (इनहाऊस कोटयासाठी माध्यमिक शाळांची यादी स्वतंत्र घेवुन यावी यामध्ये **१) अ.क्र. २) संस्थेचे नांव ३) माध्यमिक शाळेचे नांव ४) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव, त्यांचे युडायस नंबर व इंडेक्स नंबर** या तक्त्यामध्ये स्वतंत्र मध्ये यादी सोबत आणावी)

३) प्राचार्य, तंत्रसहाय्यक, प्रवेशाचे काम करणारे प्रमुख यांचे नांव, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी, कार्यालयाचा फोन नंबर देणे गरजेचे आहे.

४) वसतीगृहाची सुविधा उपलब्ध असल्यास त्याबाबची सर्व माहिती तयार करुन घेवुन येणे.

५) कनिष्ठ महाविद्यालयात मान्य असणा-या सर्व शाखांची माहिती, तुकडयांची माहिती व मान्य असणा-या विषयांची माहिती सोबत घेऊन येणे आवश्यक आहे. तसेच पासवर्ड बदलण्यासाठी विचारलेला प्रश्न व उत्तर लिहुन घेणे.

६) सर्व सिट मॅट्रिक्स भरतांना आपल्याकडे उपलब्ध असणारे अनुदानित, विना अनुदानित , कायम विना अनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील उपलब्ध असणारे मिडियम एकुण जागांची संख्या, मान्य विषय, आयटी विषयाची मान्यता, बायफोकल विषयाची मान्यता, विनाअनुदानित साठी पीटीए ची मान्यता सोबत आणणे आवश्यक आहे.

७) अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांची फी ही सुधारित शासन निर्णयानुसार आकारण्यात येणार आहे, त्यामुळे सध्या रजिस्ट्रेशन मध्ये अनुदानित कॉलेजने कोणत्याही प्रकारची फी नोंदवू नये.

८) विना अनुदानित, कायम विना अनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित या महाविद्यालयांची फी नोंदवीतांना शुल्क अधिनियम-२०११ व दि. २१.०४.२०१६ (फी ॲक्ट) नुसार संपुर्ण कार्यवाही केलेली असावी. त्या बाबतची सर्व कागदपत्रे तपासणीसाठी सोबत घेवुन यावीत. फी ॲक्ट मधील नियमानुसार या महाविद्यालयांनी फी बाबतची ची नोंद करावी. याबाबत संपुर्ण जबाबदारी संबधित प्राचार्य व संस्थेची राहील याची नोंद घ्यावी. फी बाबतचे हमीपत्र रजिस्ट्रेशनच्या वेळी प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने सादर करावे. हमीपत्राचा नमुना सोबत दिलेला आहे.

९) ज्या महाविद्यालयांमध्ये व्यावयासिक अभ्यासक्रम (एचएसव्हीसी/एमसीव्हीसी) उपलब्ध आहे, त्यांनी रजिस्ट्रेशनसाठी आवश्यक ती कागदपत्रे सोबत आणावीत.

**सोबत १) रजिस्ट्रेशनचे झोननिहाय वेळापत्रक**
**२) फी व इतर बाबची हमीपत्रक**
**३) रजिस्ट्रेशनासाठी नव्याने ऑफलाईन भरलेला फॉर्म**

MRaut 5.4.17

(मिनाक्षी राऊत)
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**
१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे

## कॉलेज रजिस्ट्रेशनचे वेळापत्रक

**टिप :- सूचना क्रमांक १ ते १३ प्रमाणे कॉलेज रजिस्ट्रेशनसाठी कनिष्ठ महाविद्यालयांनी कागदपत्रासह अद्ययावत फाईल घेऊन दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे उपस्थित रहावे.**

| अ. क्र. | झोन क्रमांक | दिनांक | वेळ | रजिस्ट्रेशन ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ६ | **०६.०४.२०१७** | स.१०.०० ते १२.००<br>दु.१२.०० ते २.००<br>दु.२.०० ते ४.००<br>दु.४.०० ते ७.०० | एस.एम.जोशी कॉलेज हडपसर पुणे-२८ |
| २ | १<br>२<br>३<br>४ | ०७.०४.**२०१७** | स.१०.०० ते १२.००<br>दु.१२.०० ते २.००<br>दु.२.०० ते ४.००<br>दु.४.०० ते ७.०० | एस.एम.जोशी कॉलेज हडपसर पुणे-२८ |
| ३ | ५<br>७ | ०८.०४.**२०१७** | स.१०.०० ते १२.००<br>दु.१२.०० ते २.००<br>दु.२.०० ते ४.००<br>दु.४.०० ते ७.०० | एस.एम.जोशी कॉलेज हडपसर पुणे-२८ |
| ४ | ८<br>९ | १०.०४.२०१७ | स.१०.०० ते १२.००<br>दु.१२.०० ते २.०० | एस.एम.जोशी कॉलेज हडपसर पुणे-२८ |
| ५ | नव्याने समाविष्ट | एमसीव्हीसी | दु.२.०० ते ४.००<br>दु.४.०० ते ७.०० | एस.एम.जोशी कॉलेज हडपसर पुणे-२८ |

# हमीपत्र

प्रमाणित करण्यात येते की, इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१७-१८ करिता कनिष्ठ महाविद्यालय नोंदणी साठी (रजिस्ट्रेशन ) आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाची सादर केलेली संपूर्ण माहिती (तुकडी संख्या/ शैक्षणिक शुल्क/कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रकार (अनुदानित/कायमविनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित/ अल्पसंख्यांक) मुले/मुली/मुले-मुली /विषय/द्विलक्षी अभ्यासक्रम/प्रवेश क्षमता/शाखा, इत्यादी ) बाबतची सर्व माहिती ही मी स्वत: तपासलेली असून ती बरोबर असल्याची मी खात्री केलेली आहे. मी सादर केलेल्या माहितीमध्ये काही चूक असल्यास आणि भविष्यात त्याबाबत काही कायदेशीर /न्यायालयीन /माहिती अधिकारांतर्गत प्रकरण उद्‌भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य/मुख्याध्यापक या नात्याने सर्वस्वी माझी असेल. असे या हमीपत्राद्वारे प्रमाणित करीत आहे.

दि.:- /०४/२०१७
स्थळ :-एस.एम.जोशी कनिष्ठ महाविद्यालय,
हडपसर पुणे

प्राचार्य/मुख्याध्यापक
शिक्का व स्वाक्षरी